# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) ६९९६५५९९.** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**


जा. क्र./मरासुम/प्रशासन/५६४/२०२४ दि. २३/०२/२०२४.

**विषय :- संगणक खरेदीसाठी जाहिरात.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता १०-नग संगणक खरेदी करावयाचे आहेत. संगणकाचे स्पेसीफिकेशन आणि इतर अटी, शर्ती व अन्य माहिती करीता महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर सविस्तर जाहिरात देण्यात आली; असून त्यामधील अटी शर्ती नुसार पात्र पुरवठाधारक यांच्याकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक पुरवठाधारक यांनी प्रस्तूत जाहिरातीस अनुसरुन त्यांची दरपत्रके महामंडळाचे मुख्यालयात सिलबंद लिफाफ्यात वेळ सकाळी ९.४५ पासून दि. २६/०२/२०२४ ते दि. ०६/०३/२०२४ रोजी सायंकाळी ०५:०० वाजे पर्यंत सादर करावीत.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहिल.

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

जा. क्र./मरासुम/प्रशासन/५६४/२०२४ दि. २३/०२/२०२४.

**संगणक खरेदीसाठी जाहिरात.**

# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) ६९९६५५९९.
ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in

**१) परिचय :-**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शासकीय/निमशासकीय/संवेदनशील/खाजगी व्यावसायिक आस्थापनांना सुरक्षारक्षकां मार्फत सशस्त्र सुरक्षा व संरक्षण पुरविले जात आहे.

महामंडळाचे मुख्यालयात दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे हेतू महामंडळास **१० नग संगणक (Desktop)** खरेदी करावयाचे असून, त्यासाठी स्पर्धात्मक दरपत्रके मागविण्यासाठी प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

**२) संगणकाचे स्पेसीफिकेशन :-**

**अ. संगणक कंपनी :-** HP कंपनीचे संगणक (Desktop)

**ब. (Desktop) संगणकाचे (Specification) :-**

**१.** Intel - Core I५

**२.** Gen - १२

**३.** Ram - ८ GB

**४.** HDD - १ TB (Hard Disk Drive)

**५.** SSD - २५६ GB

**६.** DDR - ४

**७.** Monitor - १८.५ Inch

**८.** Keyboard & Mouse

**९.** Operating System - Windows १० Professional किंवा Windows Professional ११ यांपैकी एक परंतु ते Factory Loaded Pre-loaded मूळ कंपनीकडून देण्यात येणारे असावे. पुरवठाधारक स्वत: इनस्टॉल करून देणार असल्यास, तशी दरपत्रके बंद करण्यात येतील; याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**१०.** Microsoft Office - २०१९ (Professional) किंवा २०२१ (Professional) म्हणजे दोघांपैकी कोणतेही एक पुरवावे; परंतु ते (Genuine) ओरीजनल मुळ कंपनीकडून देण्यात येणारे असावे. पुरवठाधारक स्वत: इनस्टॉल करून देणार असल्यास, तशी दरपत्रके बंद करण्यात येतील; याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**११.** Operating System आणि Microsoft Office हे दोन्ही ही Lifetime करीताचेच असावेत.

**१२.** Warranty - "Warranty" कालावधी स्पष्टपणे नमूद करावा. तसेच; Warranty कालावधीतील सेवा कंपनीकडून की पुरवठाधारकाकडून देणार याची स्पष्ट माहिती नमूद करावी.

**३) दरपत्रक सादर करताना खालील सूचनांनुसार सादर करावेत. :-**

१. कंपनी / फर्मच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

२. ओळखीचा पुरावा म्हणून पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ. पैंकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकीत प्रत जोडावी.

३. दरपत्रकामध्ये संगणकाची मुळ किंमत त्यावरील GST किंमत याबाबत स्वतंत्रपणे स्पष्ट नमुद करावे.

४. एकापेक्षा अधिक दरपत्रके सादर केल्यास दोन्हीही बंद करण्यात येतील. इच्छूक पुरवठादारकांनी एका वेळेस एकच दरपत्रक सादर करावे.

५. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

६. प्रस्तूत जाहिरातीत नमुद केलेले स्पेसीफिकेशन्स याबाबत काही संभ्रम/शंका असल्यास, ९.४५ AM ते ६.१५ PM या दरम्यान दुरध्वनी क्र. (०२२) ६९९६५५५५ वर संपर्क करावा.

७. पुरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

**४) दरपत्रक पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र.:-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : (०२२) ६९९६५५९९.

**५) महत्तवाच्या दिनांक व वेळ :-**

१. दरपत्रके सादर करण्याची पहिली दिनांक - दि. २६/०२/२०२४ वेळ सकाळी ९.४५ पासून सुरु

२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक - दि. ०६/०३/२०२४ व वेळ १७.०० वाजेपर्यंत.

३. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक - दि. ११/०३/२०२४ व वेळ १२.०० वाजता.

**६) निवड प्रक्रिया :-**

१. दरपत्रके सादर करण्याची मुदत संपल्यानंतर, दरपत्रके उघडणेसाठी दरपत्रकधारक यांना कमीटी सदस्यांसमवेत हजर राहणे अनिवार्य आहे. जे दरपत्रकधारक हजर राहणार नाहीत; त्यांचे दरपत्रक बाद करण्यात येतील.

२. निवड केलेल्या पुरवठादारास, निवड केल्याबाबत ई-मेल आय-डीद्वारे तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.

३. निवडलेल्या पुरवठादारकास पत्र पाठविल्यापासून आठ दिवसांच्या आत संगणक पुरवठा करणे आवश्यक राहील.

४. संगणक पुरवठा केल्यानंतर त्यामधील हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर स्पेसीफिकेशन्स नुसार ब्रॅन्डेड असल्याबाबत तपासणी करण्यात येईल. अशा तपासणीत काही त्रुटी आढळून आल्यास, निवड रद्द करण्यात येईल. देयक अदा केले जाणार नाही.

५. प्रस्तूतची जाहिरात कोणतेही कारण न देता पुर्णपणे किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महामंडळाकडे आहे.

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.